# प्रेसनोट पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण दिनांक 12/11/2023

| अ.क्र | पो.स्टे.अप.क्र. कलम | फिर्यादीचे नाव | आरोपीचे नाव | घटनास्थळ | घटना.ता. वेळ | दाखल.ता. वेळ | हकिकत |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | परतवाडा 978/23 कलम 279,337,304 अ भादवी | संजय बाबाराव हिवराळे वय 36 वर्षे रा धोतरखेडा | दिलीप शामराव कास्देकर वय 25 वर्षे रा वस्तापुर | धोतरखेडा स्टॉप | 10/11/23 चे 20/00 वा ते 20/30 वा | 11/11/23 चे 00/47 वा | हकिकत अशा प्रकारे आहे कि नमुद घता वेळी व ठिकानी यातील आरोपी याने त्याची मो.सा. हिरो क्र. एम एच 27 4749 सी आर 4749 असा असुन सदर मो.सा. चालकाने आपले वाहन निष्काळजी प्रमाणे भरधाव वेगाने चालवुन धोतरखेडा स्टॅप येथे पाई जात असलेल्या नामदेव महादेव डोंगरे यांना समोरुन धडक देऊन त्याचे मरनास कारणीभुत ठरला अशा फिर्यादीच्या लेखी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 2 | चांदूर बाजार 711/23 ।कलम 379 भादवी | महेश राजेश राव महल्ले वय 21 वर्षे धंदा- कलेक्शन बँक रा. माळीपुरा चांदूरबाजार | अज्ञात | मिरची साथ तवकल हॉटेल समोर चांदूरबाजार | 08/11/23 चे 19/00 वा ते 19/30 वा दरम्यान | 11/11/23 चे 11/15 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की नमूद घाता वेडी व ठिकाणी यातील अज्ञात इसमाने दिनांक 8/11/2023 रोजी सायंकाळी 07/ 00ते 07/30 वा दरम्यान फिर्यादीची मोसा MH 27-DN 4809 पॅशन प्लस काळ्या रंगाची ज्यावर लाल रंगाचा पट्टा असलेला गाडी ज्याचा चेसेस क्रमांक MBL HAW 265PHG03075 आणि इंजिन क्रमांक हा11E1PHG52976 अशा नंबरची मोसा वी किंमत अंदाजे 95000/- रुपये चोरून नेली आहे अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| ३ | चांदुर रेल्वे 533/2023 कलम 457,380 भा.दं वि | अरुण भास्करराव पाटील वय 55 वर्षे व्यवसाय किराणा दुकान रा.पळसखेड ता चांदुर रेल्वे | अद्यात | ग्राम पळसखेड 8 किमी पश्चिम | 10/11/23 चे 10:00 वा. ते 11/11/23 चे 05/30 वा | 11/11/2023 चे 14/00. वा | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी यांचे स्वतःचे किराणा दुकान आहे नमूद घता वेळी व ठिकानी फिर्यादी हे झोपलेल्या खोलीचे दार बाहेरून कळी लागलेली असल्याने ते मागील दरवाजा मधून बाहेर जाऊन दाराची कडे उघडली आणि फिर्यादी यांची पत्नी घराबाहेर अंगणात सडा सारण करत असताना त्यांना दुकानातील फिर्यादी यांनी ठेवलेले पैसे व तो प्लास्टिकचा डबा जो दुकानाचा गल्ला म्हणून वापर करतो तो डबा अंगणामध्ये पडलेला दिसला म्हणून त्याच्या पत्नीने फिर्यादी यांना आवाज दिला बाहेर जाऊन पाहिले तर फिर्यादी यांना घराबाहेर अंगणात प्लास्टिक डब्बा पडलेला दिसला म्हणून ते दुकानात आत मध्ये गेले तर दुकानाच्या लगतच्या खोलीला त्यांनी लावलेले कुलूप कुलूप दिसले नाही.दुकानातील आतील दरवाजा सुद्धा उघडा दिसला तसेच काउन्टरच्या डाव्हर मध्ये तीन वेगवेगळ्या डब्ब्यात ठेवलेले 1) 500 रु चे 100 नोटांचे बंडल 50,000/रु 2) 500 रु चे 44 नोटांचे बंडल 22,000/रु 3) 100 रु चे 100 नोटाचे बंडल 10,000/रु व दुकानाच्या गल्ल्यातील नगादी 700/रु असे एकुण 82700/रु दिसले नाही .कोणीतरी अध्यात चोराने चोरुन नेले.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 4 | **तळेगाव दशासर** 383/2023 **कलम** 363**भादवि** | **सुरेंद्र नारायणराव बावणे, वय** 39 **वर्षे, धंदा मजुरी, रा अमरावती** | **साहिल डोंगरे, वय-अंदाजे** 19 **वर्षे, रा धामणगाव रेल्वे** | **पोस्टे तळेगाव दशासर परीसर** | 11/11/2023 चे 14/30 | 11/11/2023 चे 20/00 वा. | **हकीकत अशाप्रकारे आहे की,नमूद घ ता वेळी व ठिकाणी आरोपी हा फियादीचे मुलगी कु वय** 15 **वर्षे 2महिने ही दिनांक** 11/11/2023**रोजी दुपारी अंदाजे** 14/30 **वाजता तिची बॅग घेऊन घरून निघून गेली तिचा शोध घेतला असता फिर्यादी यांची मुलगी ही साहिल डोंगरे याचे सोबत धामणगाव रेल्वे येथे बस स्टँड जवळ स्कुटीने जाताना दिसली फिर्यादीने आवाज दिला असता थांबली नाही तरी फिर्यादीची मुलगी हीस साहिल** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | डोंगरे याने पळवून नेले आहे अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरून सदरचा गून्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 5 | कुऱ्हा 355/2023 कलम - 294,427 ,447,506, भादवि | सौ महिला वय- 29 वर्ष | रंजीत किसन सपाटे वय 40 वर्ष रा.कु-हा ता. तिवसा जि. अमरावती | पोस्टे कु-हा परीसर ' | 11/11/2023 चे 10/30 वा | 11/11/2023 चे 17.42 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की, या तिला फिर्यादीची आई चे शेत फिर्यादीच्या नावाने असून त्याचा शेत सर्वे नंबर 5 मध्ये 96 आर अशी सव्वा दोन एकर शेती आहे त्या शेती मधील विहीर पंप फिर्यादी ही 2015 पासून पहात आहे ती शेती फिर्यादीच्या नावाने आहे मागील महिन्यात फिर्यादीच्या शेताचे कंपाउंड आरोपीने दोन ते तीन वेळा काढले फिर्यादीने आरोपीस बरेचदा सांगितले की हा रस्ता तुझा नाही आहे तुम्ही पांदण रस्त्याने जात जा फिर्यादीच्या शेतीचे कुंपण तोडल्याने चार ते पाच हजाराचे नुकसान झाले नमुद घ.ता.वेळी व ठीकाणी यातील फिर्यादी ही तिच्या मामे भावासोबत शेतीच्या कामाकरिता शेतात गेली असता शेतातील काटेचे कुंपण काढून बैलगाडी व ट्रॅक्टरची चाकोली दिसली म्हणून शेजारी राहणारा आरोपी याला विचारण्यास गेली असता तेव्हा त्याच्या हातात कुऱ्हाड होती व फिर्यादीस म्हटले की जे होते जे तुझ्याकडून होते ते करून घे अशा अश्लील भाषेत शिवीगाळ केली यानंतर तू या शेतातून ट्रॅक्टर नेल्यावरही बोलायचे नाही तुझ्यासारख्या लय पाहिल्या असे म्हणून जीवाने मारण्याची धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 6 | **मंगरूळ दस्तगीर** 572/2023 **कलम** 279,337,338,304( a )**भादवी सहक**. 134 A MV act | **गजानन देवरावजी वानखडे वय** 51 **वर्ष रा जळका पटाचे ता धामणगाव** | MH 29 BE 4318 **चा चालक** | **लालाजी बार जवळ** 14 **किमी दक्षिण** | 11/11/2023 **चे** 13/00 **वा दरम्यान** | 11/11/2023 **चे** 17/12 **वा** | **हकीकत :- अशा प्रकारे आहे की यातील यातील मृतक नामे शंकर भास्कर वानखडे हा आज दि** 11.11.23 **रोजी दुपारी** 13.00 **वा च्या सुमारास गावातील भीमराव परतेकी व नामदेव होळकर राहणार जळकापटाचे असे तिघे मोटर सायकल क्रमांक** 27 **डब्ल्यू** 607 **ने गावातील मयत इसम सुरज थूल याची राख वर्धा नदी, पुलगाव नदीपात्रात शिरवून मो सा ने ट्रिपल सीट गावी परत येत असताना औरंगाबाद नागपूर हायवे वर भातकुली ते देवगाव दरम्यान लालाजी बार जवळ गाडी क्रमांक एम एच** 29 be ४३१८ **चे चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवून समोरा समोर ठोस मारली त्यामुळे शंकर वानखडे हा जागीच मरण पावला व इतर दोघे गंभीर जखमी झाले अशा फिर्यादी गजानन वानखडे यांच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला** |
| 7 | **दत्तापूर** 591/23 **कलम** 379 **भादवी** | अंकित गजानन विनायतकर वय 24 वर्ष राहणार वाठोडा तालुका धामणगाव रेल्वे | **अज्ञात** | **अशोक विद्यालयाच्या मागे जुना धामणगाव** 3 **कीमि दक्षिण** | 10/11/23 **चे** 16/30 **वा.ते.** 11/11/23 **चे** 11/00 **वा** | 11/11/23 **चे** 12/34 **वा.** | **हकिकत अशा प्रकारे आहे की यातील फी यांचे घराचे बांधकाम सुरू असून फिर्यादी यांनी घराचे बांधकाम सुरू असल्यामुळे प्लॉटच्या बाजूला** 22 **बॅग सिमेंट व एक जुनी वापरते पाण्याची टाकी असे साहित्य ठेवले होते.. नमूद घ.त.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे घराचे बांधकाम पाहण्याकरिता गेले असता प्लॉटचे बाजूला ठेवलेल्या** 22 **बॅक सिमेंट व एक जुनी वापरते पाण्याची टाकी त्यामध्ये** 22 **सिमेंटच्या बॅगांपैकी** 20 **बॅग किमत अंदाजे** 7000 **रू व एक जुनी वापरते पाण्याची टाकी किमत अंदाजे** 1000 **रू एकूण** 8000 **रू चे कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले अशा जबानी रिपोर्ट वरून गुन्हा दाखल करून तपासात घेतला..** |
| 8 | **दत्तापूर** 592/23 **कलम** 324,504,506 ,34 **भा द वी** | **किशोर देविदासजी देवगडे वय** 40**वर्ष राहणार** | 1)**राजेंद्र पवार वय** 55 **वर्ष** 2) **किरण राजेंद्र पवार वय** 25 **वर्ष** | **फिर्यादीचे घरासमोर साईनगर धामणगाव** | 11.11.23 **चे** 12.00 **वा ते** 12.15 **वा** | 11/11/2023 **चे** 15.36 **वा** | **हकीकत अशाप्रकारे आहे की , यातील नमूद फिर्यादी यांनी आरोपी क्रमांक** 1 **यांच्या जवळून वैयक्तिक कामाकरिता अंदाजे एक वर्षांपूर्वी पाच हजार रुपये उसने घेतले होते ते फिर्यादी यांनी मागच्या महिन्यात पाच हजार रुपये परत दिले.. नमूद घ.त.वेळी व ठिकाणी फिर्यादी हे घराचे** |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | साईनगर धामणगाव रेल्वे मोबाईल | दोन्ही राहणार यशोदा नगर धामणगाव रेल्वे | रेल्वे | दरम्यान | | अंगणात उभे असता आरोपी क्रमांक 1 व 2 हे फिर्यादीच्या घराजवळ आले व फिर्यादी यास माझे उसने घेतलेल्या पैशाचे व्याज दे असे म्हणून आरोपी क्रमांक 1 यांनी त्याच्या हातातील कळ्यांनी फिर्यादीच्या डोक्यावर मारले त्यामुळे फिर्यादीच्या डोक्यातून रक्त निघाले तसेच आरोपी क्रमांक 2 याने आमचे पैसे नाही दिले तर तुला पाहून घेईल अशी धमकी दिली अशा फिर्यादीच्या जबांनी रिपोर्ट व मेडी सर्टि वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला.. |
| 9 | आसेगाव 285/23 कलम 452,324,294, 504,506,34 भादवी | सौ महिला वय 42 वर्ष | 1. वृषभ मोहन कैथवास<br>2. राजा मोहन कैथवास<br>3.विनोद कैथवास<br>4.बबली मोहन कैथवास सर्व रा. आसेगाव पूर्णा | आसेगाव पूर्णा , | 10/11/23 चे 19/00 दरम्यान | 11/11/23 चे 01/05 वा. | हकीकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता. वेळी व ठिकाणी फिर्यादी दुकान दुकानांमध्ये हजर असताना बबली कैथवस हिचा मुलगा आला त्याने माझे दुकान उघडून दिवा लावला माझ्या सासूने त्याला विरोध केला तर तिला लोटून दिले व म्हणाले की मला पैसे नको मला आता दुकान हवे असे म्हणून नमूद आरोपी यांनी तेथील विटा घेऊन माझे पतीला मारले व त्यामुळे माझ्या पतीच्या हाताला व पायाला जखम होऊन रक्त निघाले त्यानंतर माझ्या घरासमोर माझ्या मालकीची बोलेरो गाडी एम एच 27 बीई झिरो 0574 हिचा पुढून काच फोडून 10000 रुपयाचे नुकसान केले व मला भर रस्त्यावर म्हणाली की तू रांड हे.सबके पैसे खा बैठी अशी अश्लील शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली.आहेअशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 10 | खल्लार .256/2023 कलम 279, 337, 429 भादवी | किशोर बाबुराव पर्वतकर , वय 36 वर्ष रा. मोचार्ड ता. दर्यापूर , जि .अमरावती | प्रसन्न अतुल बुरघाटे , वय 25 वर्ष, रा. लांडी ता. दर्यापूर , जि. अमरावती | ग्राम मटारगाव, स्टॅन्ड | 09/11/2023 चे 17/30 वा दरम्यान | 11/11/2023 चे 19/04 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की यातील फिर्यादी नमूद घ ता वेळी व ठिकाणी हे शेतातून बैल बंडीत कापूस घरी नेत असताना माटरगाव फाट्यावर दर्यापूर कडून एक इसम भार धाव वेगाने पल्सार गाडी mh 27 DG 0086 क्रमांकाचा चालक याने एकदम बंडीला धडक मारली त्यामुळे बंडीच्या बैलाचा पाय मोडला त्यामुळे बैल जखमी झाला तसेच बैल बंडी चे सुद्धा नुकसान झाले व धडक मारणाऱ्या इसमास सुद्धा मार लागला. अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला. |
| 11 | अंजनगाव सुर्जी 678/2023 क.307 भा. द .वी | सर तर्फे सपोनी विनोद धाडसे वय 44 वर्ष रा.पो.स्टे. अंजनगाव सुर्जी | ताराचंद इस्त्रायल काळे वय अंदाजे 25 वर्ष रा. वडाळा (धाळी) तालुका अंजनगाव सुर्जी | वडाळी (धाडी) तालुका निमगाव सुर्जी अंजनगाव सुर्जी | ११/११/२०२३ चे १६:०० वा. पुर्वी | 11/11/2023चे 20.53 वा. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील जखमी हा आपले घरी जेवण करीत असतांना नमुद घ.ता. वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने जखमीचे चे ०८ वर्षाचे मुलीला मारहाण करीत असतांना जखमीला दिसला असता, जखमीने त्याला हटकले असता, आरोपीने एकाएकी धारदार शस्त्राने (चाकु) ने जखमीच्या डाव्या कुशीत वार करून जखमी केले. वरुन डायल ११२ चे कॉल व ग्रा.रू. अंजनगाव यांचे मेमो प्राप्त झालेवरून जखमीचे बयान वरून सरतर्फे फिर्यादी सपोनि विनोद धाडसे पो.स्टे. अंजनगाव सुर्जी यांचे लेखी रिपोर्ट प्राप्त झाले वरून दाखल करून तपासात घेतला. |
| 12 | वरुड 720/23 कलम 452, 427, भादवी सह कलम 135 म. पो. अधिनियम | रोशन प्रल्हादराव पुंड वय 32 वर्ष धंदा डिस्ट्रिक कोऑर्डिनेटर राहणार सातारगाव तालुका तिवसा जिल्हा अमरावती | 1.उमेश प्रल्हाद शहाणे राहणार मोर्शी व इतर चार ते पाच त्यांचे सोबती | लोहे हॉस्पिटल वरुड अरुण सोनारे यांच्या घरी वरच्या मजल्यावरील ऑफिस | 11/11/2023 चे 13:30 वा ते 13.40 वा | 11/11/2023 चे 19. 05 वा | हकीकत अशाप्रकारे आहे की सुमारे वीस दिवसापूर्वी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालय अमरावती यांच्याकडून रिलायन्स इन्शुरन्स कंपनी अमरावती येथील ऑफिसला नमूद आरोपी क्रमांक एक यांने शेतकऱ्याच्या खात्यात पिक विमा जमा न झाल्यास रिलायन्स इन्शुरन्स ची कार्यालय फोडून टाकीन असे निवेदन आल्याचे फि ला जिल्हा कार्यालयाने तोंडी कळविले होते त्यामुळे मागील वीस दिवसापासून वरुड येथील रिलायन्स इन्शुरन्सचे कार्यालय बंद होते तिथे कोणीही कर्मचारी काम करीत नव्हता व ऑफिसला कुलूप होते. फिला त्यांच्या मोबाईलवर व्हायरल झालेला व्हिडिओ आला व त्यामध्ये नमूद आरोपी व त्यांचे चार ते |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | पाच सोबती हे वरुड येथील फी चे ऑफिसचे दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करून ऑफिस मधील खुर्च्यांची तोडफोड करताना दिसले वरून फीने कंपनीच्या वरुड कार्यालयात जाऊन पाहणी केली असता सदरचा प्रकार घडलेला दिसला. नमूद घ ता वेळी व ठिकाणी नमूद आरोपी क्र 1 व इतर 4 ते 5 अनोळखी कार्यकर्ते यांनी बेकायदेशीररित्या वरुड येथील फी चे कार्यालय बंद असताना कुलूप तोडून आत प्रवेश करून बेकायदेशीर रित्या खुर्चीचे तोडफोड करून बोर्ड फोडून 3000 रुपयाचे नुकसान केले अशा तिच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |
| 13 | बेनोडा 243/23 कलम 279,429 ipc 11(1)(k), (c)(g), प्राण्यांना निर्दयपणे वागवणे कायदा सह कलम 5,5(A)(1)5(B),9 प्राण्यांचाछळ प्रतिबंधक अधिनियम 1976 सुधारित 2015 | सरतर्फे HC निलेश डफडे बन 1701 पोस्टे बेनोडा | बोलेरो पिकअप वाहण क्रमांक MH27x 9704 चा चालक<br><br>फरार | नगझिरी फाटा 05 किमी पश्चिम | 11/11/23 चे 04/30 वा ते 5/15 वा दरम्यान | 11/11/2023 चे 12/02 वाजता | हकीकत अशा प्रकारे आहे की यातील नमूद घटना तारीख वेळी व ठिकाणी मिळालेल्या गुप्त माहितीवरून नगझीरी फाटा येथे स्टाफ सह नाकाबंदी केली असता आमचे दिशेने एक बोलेरो पिकअप येताना दिसली त्यास हात दाखुन थांबविली असता पिकप चालक पळून गेला त्यामधे 11गोवंश जातीचे जनावरे कत्तलीचे उद्देशाने घेऊन जाताना मिळून आले बोलेरो पिकअप वाहनाची पाहणी केली असता त्यामधे गोवंश जनावरांना दोरीने बांधून निर्दयतेची वागणूक देऊन तसेच चारापाणी न देता कत्तली करिता 11 गोवंश जनावरे किंमत अंदाजे 70,000 रुपयाची व बोलेरो पिकअप वाहण क्रमांक mh 27 x 7904की अं 350000 असा एकूण 4,20,000 रुपये चा माल ताब्यात घेऊन आरोपी विरुद्ध सदरचा गुन्हा दाखल करून तपासात घेतला |

पोलीस अधीक्षक कार्यालय अमरावती ग्रामीण
करीता